
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | लोकसाहित्याची वाहक बोलीभाषा<br>**प्रा. डॉ. अशोक पाठक**<br>**शरद ठाकर** | ११५-११९ |
| २८ | कथा, कादंबरीतून बोलीभाषांचा परिचय<br>**डॉ. वंदना बालटकर** | १२०-१२२ |
| २९ | लोकसाहित्याचे वाहक बोलीभाषा<br>**डॉ. लक्ष्मण गिते** | १२३-१२५ |
| ३० | जागतिकीकरण आणि बोली भाषा<br>**प्रा. विठ्ठल पुंडलिक भानुसे** | १२६-१२८ |
| ३१ | चारुतासागराच्या 'नागिण' कथासंग्रहातील आशय आणि भाषिक सौंदर्य (निवडक कथांच्या आधारे)<br>**प्रा. अनुसया राजाराम इमडे** | १२९-१३७ |
| ३२ | दलित स्वकथनांची बोलीभाषा (विशेष संदर्भ : आठवणींचे पक्षी, उपरा, गावकी आणि बेरड)<br>**डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** | १३८-१४२ |
| ३३ | 'कोयता' कादंबरीतील बोलीभाषा संदर्भ आणि चर्चा<br>**प्रा. गायकवाड देविदास बाबुराव** | १४३-१४६ |
| ३४ | मराठी बोलीभाषा व साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाह<br>**डॉ. शत्रुघ्न जाधव** | १४७-१५० |
| ३५ | समाज जीवन संदर्भातील बोलीभाषेचे उपयोजन<br>**डॉ. पंढरी डोईफोडे** | १५१-१५३ |
| ३६ | साठोत्तरी दलित कवितेतील बोलीभाषा<br>**प्रा. डॉ. नरवाडे भास्कर विठ्ठलराव** | १५४-१५७ |
| ३७ | अशोक पवार यांच्या कादंबरीतील भटक्यांच्या बोलीभाषा<br>**प्रा. लक्ष्मण मोहनराव सोळंके** | १५८-१६० |

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३५. समाज जीवन संदर्भातील बोलीभाषेचे उपयोजन

**डॉ. पंढरी डोईफोडे**
सहयोगी प्राध्यापक, संत भगवानबाबा महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि. बुलडाणा.

## प्रस्तावना

भाषा आणि समाज हे एकमेकांशी अगदी निकटतेने बांधलेले असतात. समाजातील बदलांबरोबर भाषेतही बदल घडत असतात. नवे शब्द तयार होणे जुने शब्द वापरातुन निघुन जाणे. परक्या भाषेतुन शब्द स्विकारणे नव्या म्हणी वाक प्रचार तयार होणे असे अनेक प्रकारचे बदल भाषेत होत असतात. भाषा वाढते म्हणजे तिच्यातील शब्द वाढतात. शब्द ही मनात उदभवलेल्या कल्पनांची व गोचर पदार्थांची नावे असतात हे उघडच आहे. हे शब्द जो–जो जास्त होत जातात तो–तो भाषेची समृध्दी होत जाते. शब्दांची वाढ अधिक होण्याची जी अनेक साधने आहेत. त्यात रूपकांची योजना हे एक फार मोठे साधन आहे. आपण 'हडकणे' हा शब्द 'वाळणे' या अर्थाने वापरतो. पण मुळचे ते रूपक आहे. वाळुन–वाळुन फक्त हाडे उरणे म्हणजे हाडकणे पण आता हे काव्य नाहीसे होऊन त्याला अगदी साध्या शब्दाच्या अर्थाचे रूप आले आहे.

## अनुभव क्षेत्रानुसार बोलीची विविध रूपे

अनुभव क्षेत्रानुसार बोली ही विविध रूपे धारण करते. प्रत्येक जीवन क्षेत्रात वापरला जाणारा शब्द संग्रह वैशिष्टयपुर्ण असतो. भाषीक व्यवहार करणा–या व्यक्तीला तो माहीत असतो किंवा माहीत करूण घ्यावा लागतो. कारण त्या- त्या क्षेत्रात त्या–त्या शब्दांना विशिष्ठ अर्थ असतो. अनुभव क्षेत्रानुसार बोलीभाषा विविध रूपे धारण करते याचा अर्थ असो नव्हे की, एका अनुभव क्षेत्रातील बोली भाषा अन्य बोलीभाषेपेक्षा संपुर्ण तया भिन्न असते. त्यात साम्य आणि भेद दोन्हीही गोष्टी असतात. शब्दाला असलेले अर्थ संदर्भाने निश्चित होत असतात. म्हणुनच संदर्भ बदलला की अर्थही बदलतो असे अनुभवाला येते. 'स्वर' हा शब्द गायकाने वापरला आहे की, व्याकरणाच्या शिक्षकाने वापरला आहे. 'धाव' हा शब्द लोहाराने वापरला आहे की, किकेट खेळणा–या खेळाडुने वापरला आहे. 'पक्ष' पंचागकर्तांने वापरला आहे की, राजकिय नेत्याने वापला आहे. यावर त्याचा अर्थ ठरत असतो. अनुभव क्षेत्रानुसार शब्दांचे अर्थ बदलाची किया ज्याप्रमाणे घडते त्याच प्रमाणे एकाच वस्तुला अथवा मृतिला अनुभवक्षेत्रानुसार वेगवेगळे संबोधन प्राप्त होवु शकते. उदा घरात आपण पितो ते पाणी असते देवळात तीर्थ असते. प्रयोग शाळेत H2O असते. तर कवितेत जीवन सुध्दा असते. भटजीला दक्षिणा मिळते. लेखकाला मानधन मिळते तर कामगाराला पगार मिळते. कोणत्या प्रसंगी कोणते शब्द योजावयाचे हे व्यक्तीला अनुभवाने आणि समाजात वावरलेल्याने समजते.

बोली भाषेतुन दिसणारी स्त्री

आपण लहानपणी कोणती भाषा बोलावी हे आपल्या हातात नसते. पहिली भाषा सभोवताच्या समूहाची जी असेल तीच आपली होते. बोली भाषा आणि भावना यांचा गहरा संबंध आहे. आणि त्यातुन मुरलेले मनातुन नाकारायला फार प्रयत्न लागतात. माणसाच्या जिव्हाळयाच्या जो विषय शृंगार तो मालकी भावनेशी जोडलेला नवरा श्रेष्ट हवा आणि नवरी कुमारीला शिवाय शरीराने तर मालकीची हवीच आणि कामजीवनात पॅसिव्ह तिच्या शरीराच वर्णन खायच्या वस्तुसारख केलेल 'छातीवरची फळ' वगैरे त्याने तिच्यावर झडप घातली या सगळयातुन शिकारी–सावज हे नात दिसत तिला पाहुन लाळ टाकायला लागली वगैरे. असली बुलुक्षित वर्णन ही पुरूषदेहाची होत नाहीत. त्यातुन अपमानास्पद बाजु बाजु म्हणजे बाई शरीर ही कल्पना 'बायकांची अक्कल' विनोद विषय किंवा बायकांची जाडी दोन्हीतुनही शरीर महात्म्यच दिसते. 'एक गेली तर छप्पन मिळतील' हा आमच्या नव–यांचा बाणा उलट वाक्य सापडत नाही नसत हा गेला तर दुसरा मिळेल अस वाक्यसुध्दा इतत्या माणसांच्या कानांना कसासंच वाटते.

अध्यात्म क्षेत्रात सुध्दा चिखलफेक स्त्रीमोह हे तर नरकाचे साधर, 'बरे झाले देवा बाईल कर्कशा ही आमची संतवाणी स्त्री देहाचे शृंगाराची, सहजीवनाची पवित्रता न समजलेले अति ओंगळ वर्णन 'धर्म या नावाने लिहिल्या जाणा–या पुस्तकांतुन सापडतात. मात्र मातृशक्तीचे कौतुक हा याला सन्माननीय अपवाद 'माता' या स्वरूपात का होईना स्त्रीचा बराच गौरव तिच्या शक्तीची जाणीव दिसते.

राजकिय व्यक्तिमत्वे आणि त्यांची बोली भाषा

सध्याच्या पुर्ततेसाठी राजकिय क्षेत्रात जाणते नेते बोलीभाषा उपयोग प्रभावीपणे करतात. राजकिय क्षेत्रातील ध्येयवादी नेत्यांना समाजाचे परिवर्तन घडवुन आणावयाचे असते. आणि या ध्येयाबद्दलच्या तळमळीतुन त्यांची भाषा घडत असते. त्याचप्रमाणे नेत्यांच्या व्यक्तिमत्वाची त्याच्या भाषेशी निकटचा संबंध असतो. राजकिय क्षेत्रात नेत्यांना सतत भाषणे करावी लागतात. आणि वक्तृत्वाला महत्व असतेच राजकारणातील कसोटीच्या क्षणी भाषण कसे केले जाते या पेक्षा काय बोलेले जाते योच महत्व अधिक असते. वक्तृत्वाच्या अलंकारांनी नटलेले भाषण असले की त्याचा लोकांच्या मनावर प्रभाव पडतो. याचे कारण त्यांच्या बोलीमधिल सुष्पष्ट विचार आणि त्याही पेक्षा त्यांच अंतःकरणातील तळमळ याचा आविष्कार अधिक असतो. सत्तेचा संघर्ष हा राजकारणातील महत्वाचा भाग आहे. अशा संघर्षात बोली भाषाही विविध त–हेने वापरली जाते. राजकिय नेते आपली शक्ती आकमक भाषा वापरून व्यक्त करतात. भाषावार प्रांतरचनेमुळे सर्व राज्याच्या विधिमंडळाचे काम प्रादेशिक भाषेतुन चालते. त्यामुळे तेथील वादविवाद रोखठोकपणा व चैतण्य आलेले असते. विशेषतः शेतक–यांचे प्रतिनिधि ग्रामिण बोली भाषेचा अतिशय प्रभावी उपयोग करताना आढळुन येतात. प्रत्येक आमदाराच्या भाषेमध्ये तो ज्या वर्गातुन आलेला असतो त्याचे प्रतिबंब पडते. राजकिय पुढा–यांची जाहीर सभेतील भाषणे आणि बंदिस्त सभागृहातील भाषणे यांच्या शैलीमध्ये फार मोठे अंतर असते. निवडणुकीच्या सभेत बोलतांना एखादा वक्ता स्थानिक

लोकांना माहीत असलेल्या लफड्याकुलंगड्याचा सफाईने उल्लेख करतो. आणि लोक मनसोक्त हसुन त्याला प्रतिसादर देतात अशा प्रकारे प्रत्येक क्षेत्रातील बोलीभाषा ही मराठी साहित्याला समृध्द करतानाच दिसुन येते.

संदर्भ

1. डॉ.दिनेश भोंडे, मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम प्रकाशन, कुलसचिव, यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,2000
2. दै.दिव्य मराठी, अकोला आवृत्ती, दिनांक 27 फेब्रवारी 2018 पुष्ठ कमांक 4 (मराठी भाषादिन विशेष)
३. डॉ.मधुकर मोकाशी, व्यक्तीमत्व विकास आणि भाषा, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे प्र.आ.2009